





# एकमेका साह्य करू!

**मितेश जोशी**

**पर्यावरणाविषयी तरुणाई** किती सजग आहे याची प्रचीती सध्या अवतीभोवती वेगवेगळ्या पद्धतीने पर्यावरण संवर्धनासाठी झोकून दिलेल्या अनेक तरुण मुलामुलींच्या कार्यांच्या निमित्ताने येते आहे. दरवर्षी ५ जूनला पर्यावरण दिन साजरा केला जातो, मात्र अशा कुठल्याही एका दिवसाचा विचार न करता खरोखरच तन-मन-धनाने पर्यावरणासाठी घाम गाळणाऱ्या या तरुणाईचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे...

मे महिन्यात कॉलेजला सुट्ट्या लागल्या, की तरुणाईला इंटर्नशिपचे किंवा भटकंतीचे विचार मनात येऊ लागतात. पण अशीही काही मुलं असतात ज्यांना वेगळंच जग खुणावत असतं. कला शाखेच्या दुसऱ्या वर्षाला असणाऱ्या कर्जतच्या उत्कर्ष जोशी या तरुणाला 'तुफान आलंया' या कार्यक्रमाने वेड लावले होते. आपणही पुढच्या वर्षी श्रमदानाला जायचं असं ठरवत या वर्षी तो अंबेजोगाई येथे एका चमूसोबत दाखल झाला. दुष्काळ काय असतो, हे इथे आल्यावर मी अनुभवलं, असं उत्कर्ष सांगतो. सर्वांत पहिल्या दिवशी अंबेजोगाईमध्ये पाऊल ठेवल्या ठेवल्या तहानेने व्याकूळ झालेला मी, पाण्याचा थेंब पोटात जाण्याची इच्छा झाली, पण उतरतो आणि पाहतो तर काय पिण्याच्या पाण्याचे कॅन्स भरून नेणारे ट्रक... पहिल्या दिवशी मी भातशिरपुरा गावात श्रमदान केलं. सामान्य व्यक्तीच्या मतानुसार श्रमदान करणं म्हणजे आपले श्रम कोणाच्या तरी उपयोगी आणणं; पण खरं तर प्रत्यक्षात श्रमदान केल्यावर कळलं की इथल्या लोकांना त्याची किती गरज आहे. नंतर आनंदवाडी, पांगुळगव्हान आणि मांडवखेळ अशा गावांमध्ये भेट देऊन जमेल तसं श्रमदान केलं. अरबुजवडी येथे ग्रामसभेचा अनुभवसुद्धा घेतला, अशी माहिती देणारा उत्कर्ष पुढच्या वर्षी श्रमदानासाठी मराठवाडा गाठणार असल्याचे सांगतो.

लहानपणापासूनच गिर्यारोहण, जंगल कॅम्पस, पक्षी निरीक्षण यामधून वन्यप्राणी, जैविक साखळी याविषयी चेंबूरच्या सुप्रिया पाटील या तरुणीचे कुतूहल वाढत होते. दिवसेंदिवस होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, अवेळी पडणारा पाऊस, नष्ट होत चाललेली जंगले यासाठी काही तरी केले पाहिजे, या विचाराने तिला झपाटून टाकले आणि



बीएस्सी झुऑलॉजीनंतर मास्टर्ससाठी एन्व्हायर्नमेन्टल सायन्स हा विषय घ्यायचे तिने मनाशी पक्के केले. मास्टर्स झाल्यानंतर लगेचच ' ट्रीज' या सोशल संस्थेबरोबर काम करायची सं सुप्रियाला मिळाली. गेली ५ वर्षं सुप्रिया या संस्थेबरोबर कार्यरत आहे. 'ग्रो ट्रीज'च्या वेबसाइटवर अत्यल्प किमतीत झाडे लावण्याची संधी लोकांना उपलब्ध आहे. आपल्याला वाढदिवसाच्या निमित्ताने झाडे लावण्याची इच्छा निर्माण झाली तर त्यांच्या वेबसाइटवर जाऊन ति जितकी हवी तितकी झाडे लावण्याची विनंती आपण करू शकतो. त्यासाठी मला थोडेसे पैसे मोजावे लागतील. पण झाड लावलेल्याचं ई-सर्टिफिकेट मला मिळतं. ही झाडे नातेवाईकांना, मित्रमैत्रिणींना विविध प्रसंगी ई-सर्टिफिकेटच्या माध्यमातून भेटही देता येतात हे विशेष! 'आम्ही गेल्या १० वर्षांत देशभरात १६ राज्यांमध्ये तिथल सार्वजनिक/वनजमिनींवर गावकऱ्यांच्या सहभागाने, अनेक कंपन्यांच्या सीएसआरच्या मदतीने तब्बल ४० लाख झाडे लावली आहेत. स्थानिक लोकांना वृक्ष लागवडीमुळे त्यांच्या उपजीविकेकरिता व पर्यायाने पर्यावरणालाही क फायदा होईल याचे महत्त्व आम्ही पटवून दिले आहे', असं सुप्रिया सांगते. या कामातून आलेले अनुभवही अविस्मरणीय असल्याचे तिने सांगितले. एकदा झारखंडमधील एका ज्येष्ठ लाभार्थीनी माझ्याकडे मन मोकळं (पान २ वर)

लोकसत्ता Fri, 31 May 2019
https://epaper.loksatta.com/c/39922099